ePaper
| वर्ष - 9 | अंक -118 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™
www.mahaenews.com | सोमवार, दि. 22 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

# नगरांच्या निवडणुकीत मारली बाजी; भाजपच धुरंधर!

**कमळ फुलले, धनुष्यबाण चालला, घड्याळानेही साधले टायमिंग, पंजाला मतदारांचा हात, मशाल पेटली नाही, तुतारी वाजली नाही!**


## आतील पानांत
- स्मृती मानधनाने इतिहास घडवला
- अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूर झाला बाबा
- भाजपाला वर्षात ३,११२ कोटींची देणगी
- आणखी एका हिंदू व्यक्तीला मारहाण


## पालिकांत राज्यात महायुती दोनशेपार

## पुण्यात ‘दादां’चीच ‘पॉवर’, 17 जागांपैकी 10 जागांवर नगराध्यक्ष विजयी

# राज्यात महायुतीचेच वर्चस्व!

## भाजप ११८,शिवसेना ६० राष्ट्रवादी ३७ / काँग्रेस ३४,ठाकरे गट ९ स्थानिक आघाड्या २५

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**राज्यभरातील नगरपरिषद, नगरपंचायतींचे निकाल आता जवळपास स्पष्ट झाले आहेत. भाजप राज्यात सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला आहे. दुसरीकडे पुणे जिल्ह्यात मात्र अजित पवारांच्या राष्ट्रवादीचीच दादागिरी पाहायला मिळाली आहे. अजित पवारांनी आपल्या बालेकिल्ल्यात पुन्हा एकदा करिष्मा करत ताकद दाखवून दिली आहे. 17 पैकी तब्बल 10 ठिकाणी अजित पवारांचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार निवडून आले आहेत.**



शिवसेनेला 4 आणि भाजपाला केवळ 3 जागांवर समाधान मानावे लागले. त्याचवेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला एकही जागा न मिळाल्याने मोठी पिछेहाट झाल्याचे समोर आले आहे. दरम्यान, नगरपालिकेतील भरघोस यशामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उत्साह वाढला आहे. राष्ट्रवादी पुन्हा एकदा जिल्हा परिषदेवर झेंडा फडकविण्यासाठी सज्ज झाले आहे. तर शिवसेना आणि भाजप जिल्हा परिषदेसाठी आक्रमक होण्याची चिन्हे आहेत. उत्तर पुणे जिल्ह्यातील जुन्नर, खेड, आंबेगाव आणि चाकण या 4 नगरपालिकांची जबाबदारी जुन्नरचे शिवसेनेचे आमदार शरद सोनवणे यांच्यावर देण्यात आली होती. या चारही नगरपालिकांवर शिवसेनेने भगवा फडकवून पक्षाची ताकद दाखवून दिले आहे. माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील आणि माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांनी प्रतिष्ठेची केलेल्या मंचरच्या निवडणुकीतही शिवसेनेने बाजी मारत राजश्री गांजळे विजयी झाल्या आहेत.

इंदापूरला प्रतिष्ठेच्या झालेल्या निवडणुकीत भरत शहा विजयी झाले आहेत. त्यांनी बंडखोर प्रदीप गारटकर यांचा पराभव केला. सासवडला काँग्रेस मधून भाजपात आलेले संजय जगताप यांच्या मातोश्री आनंदी काकी जगताप विजयी झाल्या असून, त्यांच्या माध्यमातून भाजपापाचे जिल्ह्यातील खाते उघडले आहे. तर भाजपाला तळेगाव आणि आळंदी येथे विजय मिळवत, 3 जागांवर समाधान मानावे लागले आहे.

### भाजप सर्वात मोठा पक्ष

महाराष्ट्रात सध्या भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह भाजपच्या नेत्यांनी नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत आक्रमकपणे प्रचार केला होता. नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत भाजप पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. भाजपचे 120 नगराध्यक्ष निवडून आले आहेत. भाजपची ही राज्यातील आतापर्यंतच्या नगरपालिका निवडणुकीतील सर्वोत्तम कामगिरी आहे. भाजपनं पश्चिम महाराष्ट्र, कोकण, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात चांगली कामगिरी केली आहे.


### शिंदे यांच्या शिवसेनेचे अर्धशतक

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं देखील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत चांगली कामगिरी केली आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं राज्यातील 54 नगरपरिषद, नगरपंचायतीमध्ये नगराध्यक्ष निवडून आणले आहेत. सांगोला येथे शहाजीबापू पाटील यांच्या नेतृत्वात शिवसेनेनं भाजप, शेकापच्या पॅनेलला पराभूत केलं. कोकणात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे रायगडमध्ये मंत्री भरत गोगावले, निलेश राणे यांनी चांगली कामगिरी केली आहे. कोकणात एकनाथ शिंदे यांच्या शिवेसना पक्षाचे सर्वाधिक नगराध्यक्ष निवडून आले आहेत.

### मविआत काँग्रेस मोठा पक्ष

महाविकास आघाडीत काँग्रेस पक्षानं सर्वात चांगली कामगिरी केली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात काँग्रेसनं 34 नगरपरिषद आणि नगरपंचायतीत नगराध्यक्ष निवडून आणले आहेत.

## पंतप्रधान मोदी काय म्हणाले?



“महाराष्ट्र विकासाच्या पाठीशी ठामपणे उभा आहे! नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत भाजपा आणि महायुतीवर विश्वास दाखवल्याबद्दल मी महाराष्ट्रातील जनतेचा ऋणी आहे. आमच्या लोक-केंद्रित विकासाच्या दृष्टीकोनावर जनतेने दाखवलेल्या विश्वासाचे हे प्रतिबिंब आहे. आम्ही राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी नव्या ऊर्जेने काम करण्यासाठी वचनबद्ध आहोत,” असे पंतप्रधान मोदी म्हणाले आहेत.

## पुणे जिल्ह्यात कोणत्या ठिकाणी कोणाचा नगराध्यक्ष?

- **बारामती**- सचिन सातव - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)
- **लोणावळा** - राजेंद्र सोनवणे - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)
- **तळेगाव** - संतोष दाभाडे - भाजपा (महायुती)
- **दौंड** - दुर्गादेवी जगदाळे - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)
- **चाकण** - मनीषा गोरे - शिवसेना (शिंदे गट)
- **शिरूर** - ऐश्वर्या पाचरणे - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)
- **इंदापूर** - भरत शाह - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)
- **सासवड** - आनंदी काकी जगताप (भाजपा)
- **जेजुरी** - जयदीप बारभाई - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)
- **भोर** - रामचंद्र आवारे - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)
- **आळंदी** - प्रशांत कुराडे (भाजपा)
- **जुन्नर** - सुजाता काजळे - शिवसेना (शिंदे गट)
- **राजगुरुनगर** - मंगेश गुंडा - शिवसेना (शिंदे गट)
- **वडगाव मावळ** - आंबोली ढोरे - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)
- **मंचर** - राजश्री गांजले - शिवसेना (शिंदे गट)
- **माळेगाव** - सुयोग सातपुते - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)
- **उरुळी फुरसुंगी** - संतोष सरोदे - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)

## पवारांची ‘दादा’गिरी

राष्ट्रवादी काँग्रेसकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रचाराची धुरा सांभाळली. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीनं 40 नगरपरिषद आणि नगरपंचायतीत नगराध्यक्ष निवडून आणले आहेत. अजित पवारांनी पुणे जिल्ह्याच्या होम ग्राउंड पुन्हा चांगली कामगिरी केली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीनं पुणे जिल्ह्यातील 17 नगरपरिषद आणि नगरपंचायतींपैकी 10 ठिकाणी नगराध्यक्ष निवडून आणले आहेत. एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या सातारा जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे महाबळेश्वर आणि पाचगणीत नगराध्यक्ष विजयी झाले आहेत. कोल्हापूर, बीड जिल्ह्यात देखील राष्ट्रवादी काँग्रेसला यश मिळालं आहे.

**महायुतीचा नगरपालिकांत दबदबा** महापालिकेत युतीबाबत रात्री ठरवू” – अजित पवार

# राष्ट्रवादी तिसऱ्या क्रमांकावर!

## अजित पवारांची कबुली



।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ज्यातील नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकीचे निकाल जाहीर झाले असून महायुतीने बहुतेक ठिकाणी स्पष्ट विजय मिळवला आहे. भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला, तर शिवसेना (शिंदे) दुसऱ्या स्थानावर राहिली. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला अपेक्षेपेक्षा कमी जागांवर समाधान मानावे लागले आहे. निकालानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पहिली प्रतिक्रिया देत आगामी राजकीय घडामोडींवर संकेत दिले.**

निकालानुसार भाजपला सुमारे 120, शिवसेनेला 60 तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला 36 जागांवर विजय मिळाला आहे. पक्ष तिसऱ्या स्थानावर गेल्याने पत्रकारांनी प्रश्न उपस्थित केला. त्यावर अजित पवार म्हणाले:“आम्ही कमी जागांवर लढवलं. मला वेळाही कमी मिळाला. एका दिवसाला सात सभा घेत होतो. आमचे सहकारीही मेहनत करत होते. आम्ही समाधानी आहोत, पण अजून अधिक काम करणे आवश्यक आहे.”

**युतीवरून टाळले उत्तर; रात्री निर्णयाचे संकेत**

महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी (शरद पवार) गटासोबत युती होणार का, असा प्रश्न विचारला असता अजित पवारांनी उत्तर देणं टाळलं.

“आज रात्री विचार करून सांगतो,” असे मिश्किल उत्तर देत त्यांनी संभाव्य चर्चेला वाव दिला.

**“प्रत्येकाला मत व्यक्त करण्याचा अधिकार असतो.”**

पालकमंत्रीपदाच्या तिढ्याबाबतही प्रतिक्रिया रायगड व नाशिक पालकमंत्रीपदावरून निर्माण झालेल्या तिढ्यावर पत्रकारांचा प्रश्न होता. पवार म्हणाले— “याचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे. एक वर्ष झाला तरी विकासकामे थांबलेली नाहीत.\

**महापालिका निवडणुकीच्या तयारीवर भाष्य**

महापालिका निवडणुकांमध्ये भाजप-शिवसेना, राष्ट्रवादीतील अंतर्गत नाराजी आणि स्थानिक पातळीवरील तणाव वाढू शकतो, असा अंदाज राजकीय विश्लेषक व्यक्त करत आहेत. विशेषतः महायुतीमधील पक्षांमध्ये एकमेकांचे पदाधिकारी स्वीकारण्याबाबत मतभेद वाढले आहेत. त्याबाबत अजित पवार म्हणाले. “मित्रपक्षांनी एकमेकांचे पदाधिकारी घ्यायचे नाही ठरलं होतं, पण काही घेतले गेले. मुंबईत भेटून चर्चा करणार. 9 वर्षांनी निवडणुका होत आहेत, त्यामुळे कार्यकर्ते अस्वस्थ आहेत.” महापौरपदाच्या राजकारणावरही त्यांनी भाष्य केले: “प्रत्येकाला आपला महापौर व्हावा असं वाटतं. तिथल्या परिस्थितीनुसार जिल्हाध्यक्ष निर्णय घेतील.” महायुतीला बहुमत मिळाल्याबद्दल त्यांनी राज्यातील मतदारांचे आभार मानले. “जनतेने चांगला कौल दिला आहे. 288 नगराध्यक्ष निवडून आले आहेत. त्यांचे अभिनंदन करतो,” असे पवार म्हणाले.

**निकालातून काय स्पष्ट झाले?**

राज्यातील ग्रामीण व अर्ध-नगरी मतदारांनी महायुतीवर विश्वास कायम ठेवला राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांना स्वबळाची मर्यादा जाणवली महापालिका निवडणुकांत युतीचे समीकरण अधिक गुंतागुंतीचे होण्याची शक्यता पक्षांतर्गत असंतोष आणि पदाधिकारी पळवाटे हे महायुतीपुढचे संकट निकालांनंतर महापालिका निवडणुकांपूर्वी अजित पवारांच्या भूमिकेकडे राज्याचे राजकारण लक्ष ठेवून आहे. त्यांच्या “रात्री विचार करून सांगतो” या विधानाला पुढील राजकीय घडामोडींच्या संदर्भात महत्त्व वाढले आहे.

### महापालिका निवडणुकीत शरद पवारांच्या पक्षासोबत युती करणार?

यावेळी पत्रकारांनी अजित पवारांना एक महत्त्वाचा प्रश्न विचारला. महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासोबत युती करणार का? असा प्रश्न अजित पवारांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी उत्तर देणं टाळलं आहे. आज रात्री विचार करुन सांगतो, असं मिश्किल उत्तर त्यांनी दिलं. तसेच शरद पवारांच्या पक्षाचे पुणे शहराध्यक्ष राष्ट्रवादीसोबत युती करण्यास विरोध करत आहेत. त्याबाबतही त्यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी “ठिक आहे. प्रत्येकाला स्वत:चं मत मांडण्याचा अधिकार असतो. तसं ते मांडत आहेत”, असं उत्तर अजित पवारांनी दिलं.

# सासवड नगरपालिकेत भाजपचा झेंडा

## नगराध्यक्षपदी आनंदी काकी जगताप तिसऱ्यांदा विराजमान




।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अत्यंत चुरशीच्या आणि उत्कंठा वर्धक ठरलेल्या सासवड नगरपरिषदेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून, भाजपच्या उमेदवार आणि माजी नगराध्यक्ष आनंदी काकी जगताप या तब्बल 1091 मते घेऊन निवडून आल्या आहेत. दरम्यान आनंदी काकी जगताप यांनी यापूर्वी दोन वेळा सासवडचे नगराध्यक्ष पद भूषविले असून, यावेळेस पुन्हा निवडून आल्याने तिसऱ्यांदा नगराध्यक्षपदी विराजमान होण्याचा बहुमान प्राप्त केला आहे.**

भाजपच्या उमेदवार आनंदी काकी जगताप यांना ११३६२ मते मिळाली तर त्यांच्या विरोधामध्ये उभे असलेले शिवसेनेचे माजी नगरसेवक सचिन भोंगळे यांना १०२७१ मते मिळाली आहेत. तर महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभिजीत जगताप यांना केवळ 682 मतांवर समाधान मानावे लागले आहे. त्याचप्रमाणे अपक्ष उमेदवार निकिता राजेंद्र धोत्रे यांना शतक ही पूर्ण करता आले नाही. निकिता धोत्रे यांना केवळ 98 मते मिळाली आहेत. विशेष म्हणजे 11 प्रभागांमधून तब्बल 582 मतदारांनी नोटाला पसंती दिली असल्याचे दिसून आले आहे.स्वर्गीय चंद्रकाका जगताप यांनी सासवड नगरपरिषदेवर आपल्या संपूर्ण हयाती मध्ये वर्चस्व सिद्ध केले आहे. ते स्वतःही नगराध्यक्ष राहिले आहेत तर त्यांच्यानंतर त्यांच्या पत्नी आनंदी काकी जगताप यांनाही त्यांनी नगराध्यक्ष पदावर बसविले आहे. तसेच चंद्रकाका जगताप यांच्या यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र माजी आमदार संजय जगताप यांनी नगरपरिषदेवर आपले नेतृत्व वेळोवेळी राखली आहे. दरम्यान संजय जगताप यांना आव्हान देण्यासाठी आमदार विजय शिवतारे यांनी तब्बल 15 वर्षांपासून मोहीम लढवली आहे मात्र त्यांना अद्याप पर्यंत एकदाही यश आलेले नाही.

### संजय जगतापांचे वर्चस्व सिद्ध

100 मतांच्या आसपास इतक्या फरकाने पराभव झाला होता.मागील पराभवाचा वचपा भरून काढण्यासाठी शिवतारे यांनी यावेळी मोठी ताकद लावली होती. निवडणुकीची संपूर्ण रणनीती आखली होती. यावेळी झालेल्या निवडणुकीत त्यांचे एकूण नऊ नगरसेवक निवडून आले आहेत. या माध्यमातून त्यांची नगरपरिषदेत नगरसेवकांची संख्या निश्चित वाढली आहे. मागील निवडणुकीत केवळ दोन नगरसेवकांची संख्या यावेळी मात्र नऊ पर्यंत पोहोचली असल्याने भाजपसाठी ही धोक्याची घंटा आहे.

## अजित पवार यांच्या बालेकिल्ल्यात भाजपाचे फुलले 'कमळ' नगराध्यक्षांसह २१ पैकी १५ जागांवर वर्चस्व!

# आळंदीत भाजपाचा महाविजय!

### उत्तर पुणे जिल्हा निवडणूक प्रमुख आमदार महेश लांडगे यांनी मानले मतदारांचे आभार

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टीने दिमाखदार यश संपादन करत आपली राजकीय ताकद पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्याचे नेते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाच्या महायुतीने राज्यभर उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**




राज्यातील २८८ नगरपरिषदांपैकी २१४ हून अधिक नगराध्यक्ष पदांवर भाजपाच्या महायुतीने विजय मिळवला असून, भाजपा हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. या यशाबद्दल पिंपरी-चिंचवडचे आमदार महेश लांडगे यांनी सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले आहे. पुणे जिल्ह्यातील उत्तर पुणे जिल्हा निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडताना पक्ष संघटना, स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांची एकजूट आणि विकासकेंद्रित मुद्द्यांमुळे ही निवडणूक लक्षवेधी ठरल्याचे आमदार लांडगे यांनी स्पष्ट केले.

विशेषतः श्री क्षेत्र आळंदी नगरपरिषदेत भाजपाने जोरदार मुसंडी मारत २१ पैकी १५ जागांवर दणदणीत विजय मिळवला आहे. तसेच नगराध्यक्षपदी प्रशांत पोपट कुऱ्हाडे यांनी बहुमताने विजय मिळवला, हा भाजपासाठी ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे.

"विकासाभिमुख हिंदुत्व" या भूमिकेला मतदारांनी दिलेला स्पष्ट कौल भाजपाच्या धोरणांवरील विश्वास दर्शवतो, असे आमदार लांडगे म्हणाले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पुण्यभूमीत मिळालेला हा विजय भाजपा कार्यकर्ते, पदाधिकारी आणि पक्षाच्या ध्येयधोरणांवर विश्वास ठेवणाऱ्या मतदारांना समर्पित असल्याचे त्यांनी सांगितले. आळंदीतील या महाविजयाची पुनरावृत्ती पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीतही होईल, असा ठाम विश्वास आमदार लांडगे यांनी व्यक्त केला. शेवटी त्यांनी राज्यातील सर्व विजयी उमेदवारांचे पुन्हा एकदा अभिनंदन केले.

> "राज्यातील जनतेने विकास, स्थैर्य आणि पारदर्शक प्रशासनावर विश्वास व्यक्त केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मिळालेला हा कौल आम्हाला अधिक जबाबदारीने काम करण्याची ताकद देतो. आळंदीपासून पिंपरी-चिंचवडपर्यंत सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करत, विकासाभिमुख आणि लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. राज्यातील या निवडणुकीच्या निकालांची पुनावृत्ती निश्चितपणे पिंपरी-चिंचवड महापालिकेत होईल, असा विश्वास आहे.
>
> –**महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे

## भाजपाच्या निष्ठावंतांचे रस्त्यावर उतरत आत्मक्लेष आंदोलन

### सलग दुसऱ्या दिवशी निष्ठावान कार्यकर्त्यांनी केली जोरदार घोषणाबाजी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: भारतीय जनता पक्षात शनिवारी इतर पक्षातून आजी-माजी पदाधिकाऱ्यांना प्रवेश दिल्याबद्दल पिंपरीमध्ये भाजपच्या कार्यकर्त्यांनी विरोध केला आहे. रविवारी दुपारी या इनकमिंग विरोधात माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांचे समर्थक भाजपाच्या निष्ठावंतांनी रस्त्यावर उतरत आत्मक्लेष आंदोलन केले. भारतीय जनता पक्षामध्ये महापालिका निवडणूक पार्श्वभूमीवर इतर पक्षातून २२ जणांना प्रवेश दिला आहे. मुंबईतील प्रवेशानंतर भाजपमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.**



पिंपरीतील भाजप नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या समर्थकांनी रविवारी दुपारी गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र जमा झाले होते. त्यामध्ये परिसरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, त्याचबरोबर विविध सेवाभावी संस्था संघटना आणि कार्यकर्ते यांचे पदाधिकारी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

निष्ठावान कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत प्रवेश दिल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. पक्ष नेतृत्वाने या आयारामांना थारा देऊ नये, निष्ठावंतांना न्याय द्यावा अशी मागणी केली. कार्यकर्त्यांनी संदीपभाऊ वाघेरे जो निर्णय घेतील त्या निर्णयास आमचा ठाम पाठींबा असेल अशी ग्वाही दिली.

यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना संदीप वाघेरे म्हणाले कि, "मी पैसे कमवण्यासाठी किंवा घर भरण्यासाठी राजकारणात आलेलो नाही तर समाजातील उपेक्षित घटकांचा विकास करण्यासाठी आलो आहे." काही व्यक्तींच्या पक्षप्रवेशाला आपण आधीच पक्षाकडे विरोध दर्शवला होता, तरी देखील त्यांचा प्रवेश झाला. आता माझी उमेदवारी कट करण्याचा डाव रचला जात असून, आजपर्यंत मला अडचणीत आणण्याचेच काम सातत्याने केले गेले आहे. "हिंदुत्व हेच माझं डीएनए आहे. दगा-फटक्याचं राजकारण करणारी ही मंडळी आजपर्यंत जनतेला फसवत आली आहेत," असा आरोप त्यांनी केला. प्रभागातील विकासकामांचा उल्लेख करत वाघेरे यांनी पिंपळे सौदागर ब्रिज, रेल्वे उड्डाणपूल यांसह प्रत्येक विकासकामाला जाणीवपूर्वक विरोध केल्याचा आरोप केला. "ज्यांनी प्रत्यक्षात विकासकामे केली, त्यांनाच घरी बसवण्याचा प्रयत्न केला जात आहे," असेही ते म्हणाले. यावेळी आक्रमक शैलीत बोलताना त्यांनी, "यांची वृत्ती अफजलखानाची असेल, तर मला शिवाजी महाराज व्हावे लागेल," असे विधान करत उपस्थितांमध्ये जोश भरला.

नागरिकांना आवाहन करताना संदीप वाघेरे म्हणाले, "लोकांची काम करणारे चार नगरसेवक निवडायचे की स्वतःचे घर भरणारे निवडायचे, हा निर्णय तुमच्या हातात आहे. तुम्ही मला साथ द्या, माझ्यासोबत चौघे निवडून द्या. फक्त पाच वर्षे नाही, तर सदैव मी तुमच्यासोबत खंबीरपणे उभा राहीन." या त्यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापल्याचे चित्र दिसून आले.




# बेहाल बांगलाचा बोध!

**लोकशाही केवळ असून चालत नाही. ती जिवंत ठेवण्यासाठी आवश्यक त्या नियामक यंत्रणा ताठ कण्याने उभ्या असाव्या लागतात. त्या तशा नसतील, तर काय होते याचे आपला दुसरा शेजारी बांगलादेश हे उत्तम उदाहरण.**

त्या देशातील अंतर्गत उद्रेकाचा एक आवेग संपून दुसरा सुरू झाला आहे. पहिल्याने तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांच्या राजकीय कारकीर्दीचा घोट घेतला. दुसरा आवेग या देशास आणखी अस्थिर करेल.



येत्या फेब्रुवारीत त्या देशात सार्वत्रिक निवडणुका प्रस्तावित आहेत. त्या देशातील दोन प्रमुख राजकीय पात्रांच्या अनुपस्थितीत होऊ घातलेली ही कित्येक वर्षातील पहिलीच निवडणूक. शेख हसीना या भारतात आणि त्यांच्या प्रमुख राजकीय विरोधक बेगम खालिदा झिया या अत्यवस्थ. या दोघींशिवाय तेथे इतर राजकीय नेता नाही. त्या अनुक्रमे अवामी लीग आणि बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) या दोन मोठ्या पक्षांच्या नेत्या. गेल्या वर्षी जुलै महिन्यात हसीनांविरोधात विद्यार्थी आंदोलन सुरू झाले, त्यास सार्वत्रिक निवडणुकीची पार्श्वभूमी होती. त्या वेळी सत्तारूढ अवामी लीगने बीएनपीला निवडणूक लढू दिली नाही. त्यातून उठलेला राजकीय वणवा अखेर सत्ताधीशांनाच भस्मसात करून शमला. आता बांगलादेशचे हंगामी प्रभारी मोहम्मद युनुस हे हसीनांच्या चुकीची पुनरावृत्ती करत आहेत. त्यांनी या वेळी अवामी लीगवर बंदी घातली. त्या देशात राजकीय पक्ष फार नाहीत. ईन मीन दोन-तीनच. त्यात लोकसंख्या अवाढव्य. त्यातही पुन्हा नोकरदारांपेक्षा राजकीय कार्यकर्त्यांचे तांडेच जास्त. साहजिकच एखाद्या पक्षावर अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली की विरोधी जनक्षोभाचा स्फोट होतो. बीएनपीची मुस्कटदाबी झाली, त्यातून हसीनांचा राजकीय बळी गेला. आता अवामी लीगची मुस्कटदाबी झाल्यास, त्यातून आणखी किती बळी जातील, हे कोणीच सांगू शकत नाही. पण दोन्ही उद्रेकांमध्ये भारताविरुद्धचा राग हा प्रमुख धागा असल्याने आपण त्याकडे दुर्लक्ष करणे हे अविचारी आणि धोकादायक ठरेल. शरीफ ओस्मान हादी या तरुण राजकीय नेत्याच्या हत्येवरून बांगलादेशात ताजा आगडोंब उसळला. यातून उमटणाऱ्या प्रतिक्रिया व्यापक आणि भयानक आहेत. ढाका आणि इतर अनेक भागांत मोर्चे निघाले. दोन वृत्तपत्रांची कार्यालये जाळण्यात आली. भारतीय राजनैतिक अधिकाऱ्यांच्या निवासस्थानांवर हल्ले झाले. आणखी एके ठिकाणी एका हिंदू व्यक्तीस त्याने कथित प्रेषितनिंदा केल्याच्या आरोपावरून ठेचून मारले गेले आणि त्याचा मृतदेह झाडाला टांगून त्याचे जाहीर दहन करण्यात आले. प्रभारी शासक मोहम्मद युनुस अर्थतज्ज्ञ म्हणून योग्य असतीलही, पण राजकीय जबाबदारी त्यांना अजिबात पेलवलेली नाही. हसीनांच्या पलायनावेळी त्या देशात जवळपास निर्नायकी अवस्था निर्माण झाली म्हणून युनुस यांची सर्वानुमते हंगामी सरकारचे सल्लागार म्हणून नियुक्ती झाली होती. त्यांची प्रशासनावर पकड नाही हे एव्हाना सिद्ध झालेलेच आहे. अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा आब राखू, अल्पसंख्याकांचे रक्षण करू, राजदूतावास, वाणिज्य कचेऱ्या आणि इतर परदेशी आस्थापनांचे रक्षण करू अशी हमी त्यांनी अनेकदा दिली. एक तर ते स्वत: या आश्वासनांविषयी गंभीर नाहीत किंवा त्यांना बांगलादेशातील युवा राजकीय कार्यकर्ते मोजत नाहीत, हेच ताज्या घडामोडींनी पुन्हा सिद्ध केले. तेथील काही भारतीय व्हिसा केंद्रे बंद करावी लागली. मंदिरांवरील हल्ले कमी झाले असले, तरी थांबलेले नाहीत. गेल्या महिन्यात तेथील एका न्यायाधिकरणाने शेख हसीना यांना विविध गुन्ह्यांसाठी मृत्युदंड आणि जन्मठेप अशी जबर दुहेरी शिक्षा ठोठावली. हसीना आमच्या लेखी न्यायसिद्ध गुन्हेगार असल्यामुळे, त्यांना आमच्याकडे सोपवावे ही बांगलादेशची मागणी आपण मान्य केलेली नाही. त्या न्यायाधिकरणाची निर्मिती मुळात हसीना यांचीच. शिवाय भारत आणि बांगलादेश यांच्यात गुन्हेगारांच्या प्रत्यार्पणाविषयी रीतसर करारही अस्तित्वात आहे. पण त्यांतील काही तरतुदींचा सोयीस्कर अर्थ लावून आपण हसीनांना बांगलादेश सरकारकडे सोपवणे टाळतो. ही बाब भारताला राजनैतिकदृष्ट्या अडचणीची ठरेलच. पण बांगलादेशातील जनतेतही आपल्याविषयी संताप आणि संशय वाढवणारी ठरेल.

## संपादकीय »

### आमदार तुपाशी

***मंत्री व आमदारांच्या मासिक वेतन व भत्त्यांमध्ये जवळपास २०० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेऊन सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला.***

आमदारांचे सध्याचे मासिक वेतन व भत्ते एक लाख ११ हजार रुपये एवढे आहेत. नव्या वाढीनुसार आमदारांना आता दरमहा ३ लाख ४५ हजार रुपये मिळणार आहेत. मुख्यमंत्र्यांचे वेतन दरमहा ९८ हजारांवरून ३ लाख ७४ हजार, मंत्र्यांचे ९७ हजारांवरून ३ लाख ५८ हजार, विधानसभा अध्यक्षांचे ९७ हजार ५०० रुपयांवरून ३ लाख ६८ हजार रुपये एवढे घसघशीत वाढणार आहे. माजी आमदारांच्या निवृत्तिवेतनातही वाढ करण्यात आली. देशात महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या आमदारांना सर्वाधिक वेतन व भत्ते मिळतात. महाराष्ट्रात ही रक्कम दरमहा ३ लाख एक हजार रुपये असल्याची माहिती विधिमंडळाच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे, तर तेलंगणातील आमदारांना दरमहा साडेतीन लाखांच्या आसपास वेतन व भत्ते मिळतात. खासदारांना दरमहा अडीच ते तीन लाखांच्या आसपास वेतन व भत्ते मिळतात.

प्रदूषित हवेमुळे दिल्लीकर हळूहळू मरू घातले आहेत, पण विरोधकांनी हा मुद्दा लावून धरल्यानंतरही संसदेत यावर चर्चा होऊ दिली गेली नाही. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांना तर एक्यूआय हा तापमापक वाटतो. विविध देशांच्या दूतावासांनी आपल्या दिल्लीतल्या नागरिकांसाठी धोक्याचा इशारा दिला आहे.

# दिल्लीकर जिवंत तरी कसे?

तोंड काळे करायचे असेल तर दिल्लीत या, असे गमतीनेही म्हणायची सोय राहिलेली नाही. कारण, आत्ता दिल्लीत आलात तर खरोखरच तोंड काळे होईल! धुके आणि धूर यांचे मिश्रण म्हणजे धुरके. या धुरक्याचा अतिप्रचंड थर निर्माण झाला आहे. या थरातून गेलात की, तुम्हाला काहीही दिसणार नाही. तुमच्या नाका-तोंडात मात्र धूर, धूळ जात राहील. तुमचा चेहरा काळा होईल. तुम्ही थुंकलात तर तुमच्या तोंडातून काळी थुंकी बाहेर पडेल. 'प्रदूषणयुक्त अतिघातक' हे वर्गीकरणदेखील कमी पडेल इतकी दूषित हवा तुमच्या छातीत दर सेकंदाला जाते. तुम्हाला फुफ्फुसाचे आजार कुठल्याही क्षणी होतील, याची भीती मनात बाळगून आणि जीव मुठीत धरून तुम्ही दिल्लीत वावरता. तुम्हाला न्यूमोनिया झाला तर अवस्था आणखी वाईट. हे वाचून कोणालाही वाटेल की, दिल्लीकर जिवंत कसे? दिल्लीकर हळूहळू मरू घातले आहेत. प्रदूषित हवेमुळे माणूस



लगेच मरत नाही. विषारी वायू तुम्ही दररोज दरसेकंदाला नाकाने शरीरात घेत जाता, फुफ्फुसे कालांतराने कमकुवत होत जातात. दिल्लीतील वायूप्रदूषणामुळे फुफ्फुसाचे आजार होऊन लोक मरतात, पण तशी कोणतीही आकडेवारी केंद्र सरकारकडे नसल्याचे अजब लेखी उत्तर केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने संसदेमध्ये याच हिवाळी अधिवेशनात दिले. करोनाच्या काळात प्राणवायूच्या पुरवठ्याअभावी करोनाचा एकही रुग्ण दगावलेला नाही, असा अजब दावा त्या वेळी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने केला होता. तसाच हा भन्नाट दावा आहे. फक्त दिल्लीतच नव्हे, उत्तरेच्या संपूर्ण पट्ट्यात हवेची गुणवत्ता इतकी वाईट आहे की, निकृष्टतेचे बहुधा नवे निर्देशांक तयार करावे लागतील! दरवर्षी दिल्ली-एनसीआर आणि उत्तरेकडील राज्यांमध्ये हवेच्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर होतो. मात्र तो राजकीय मुद्दा ठरत नाही. या वर्षी हवेच्या प्रदूषणाने दिल्लीकरांच्या संयमाची परिसीमा ओलांडली. आताही हा मुद्दा राजकीय झाला नाही तर २०४७च्या कथित 'विकसित भारता'च्या उद्दिष्टालाही अर्थ उरणार नाही, हे निश्चित. खरे तर या वेळी संसदेच्या हिवाळी अधिवेशनामध्ये दोन्ही सभागृहांत दिल्लीतील प्रदूषणावर चर्चा करण्याची संधी चालून आली होती. 'रामजी' वगैरे विधेयके संमत झाल्यानंतरही विरोधकांनी सभागृहांमध्ये गोंधळ घातला. हा गोंधळ बघून लोकसभाध्यक्षांनी सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करून टाकले. असे करण्याची खरोखरच आवश्यकता नव्हती. विरोधकांनी गदारोळ केला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## ३०० मीटरचा मुख्य स्पेन

## मढ-वर्सोवा केबल पूल लवकरच सुरू होणार

# दीड तासांचा प्रवास 10 मिनिटांत

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मढ-वर्सोवा केबल स्टेड पुल प्रकल्पाच्या बांधकामात लक्षणीय प्रगती दिसली आहे. ज्यामुळे मुंबईकरांना वाहतूक कोडीतून मोठी दिलासा मिळेल अशी अपेक्षा आहे. बीएमसी फेब्रुवारी २०२६ मध्ये या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे बांधकाम सुरू करण्याची तयारी करत आहे. सुमारे २.३९५ कोटी रुपये खर्चुन बांधल्या जाणाऱ्या या पुलाला केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडून मंजुरी मिळाली आहे. त्यानंतर प्रकल्पाच्या ठिकाणी प्राथमिक सर्वेक्षण आणि माती परीक्षणाचे काम सुरू करण्यात आले आहे.**

## मुंबईच्या पश्चिम उपनगरांना दिलासा



हा पूल मद जेट्टी रीडपासून सुरू होईल, खाड्या ओलांडल आणि अंधेरीच्या मसौवा परिसरातील फिशरीज युनिवर्सिटी रोडजवळ जोडे सध्या, वमौवा आणि मंड दरम्यान कोणताही पेट मार्ग नाही. ज्यामुळे प्रधान लोखंडवाला, ओशिवरा, लिक रोड किंवा मार्च रोड मार्गे लांब आणि वेळखाऊ प्रयास करावा लागतो. नदीच्या वेळेत, हा प्रवास एक ते दीड तासाचा असती. प्रस्तावित पूल बांधल्यानंतर, अंतर अंदाजे ५८ ते २० किलोमीटरने कमी होईल आणि प्रवासाचा वेळ फक्त १० मिनिटे राहील, याचा पेट फायदा हवाई दल क्षेत्र आयएनएस हमला, मधु, मार्वे, मालाड आणि कांदिवली येथे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना होईल. २.०६ किमी लांबीच्या या पुलावर ६०० मीटर केबल-स्टेड संवशन असेल, ज्यामध्ये ३०० मीटरचा मुख्य स्पेन असेल.दहिसर-भाईंदर कोस्टल रोडला जोडणारा एक अतिरिक्त मार्ग देखील प्रस्तावित आहे. बीएमसी अधिका-यांच्या मते, वन विभागाकडून अंतिम मंजुरी आणि उच्च न्यायालयाची परवानगी मिळाल्यानंतर पूर्ण प्रमाणात काम सुरू होईल, हा प्रकल्प ३१ मार्च २०२९ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. तर दुसरीकडे मुंबई-पुणे एक्सप्रेसवे अधिकृतपणे यशवंतराव चव्हाण एक्सप्रेसचे हा भारतातील पहिला ६-लेन रुद कॉंकीट, प्रवेश नियंत्रित टोल एक्सप्रेसवे आहे. है ९४.५ किमी अंतर कापते आणि महाराष्ट्र राज्याची राजधानी आणि भारताची आर्थिक राजधानी असलेल्या रायगड-नवी मुंबईला महाराष्ट्राची सांस्कृतिक आणि शैक्षणिक राजधानी असलेल्या पुण्याशी जोडते, मुंबई-पुणे एक नवीन द्रुतगती महामार्ग आता मार्गी लागला आहे. केंद्र सरकारने ११.१ लाख कोटी किंमतीच्या प्रकल्पांना मंजुरी दिल्याने, प्रवास आणि गतिशीलता वाढविण्यासाठी महाराष्ट्रातील रस्ते पायाभूत सुविधांमध्ये अभूतपूर्व सुधारणा होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.मढ-वर्सोवा केबल स्टेड पुल प्रकल्पाच्या बांधकामात लक्षणीय प्रगती दिसली आहे. ज्यामुळे मुंबईकरांना वाहतूक कोडीतून मोठी दिलासा मिळेल अशी अपेक्षा आहे. बीएमसी फेब्रुवारी २०२६ मध्ये या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे बांधकाम सुरू करण्याची तयारी करत आहे. सुमारे २.३९५ कोटी रुपये खर्चुन बांधल्या जाणाऱ्या या पुलाला केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडून मंजुरी मिळाली आहे. त्यानंतर प्रकल्पाच्या ठिकाणी प्राथमिक सर्वेक्षण आणि माती परीक्षणाचे काम सुरू करण्यात आले आहे. हा पूल मद जेट्टी रीडपासून सुरू होईल, खाड्या ओलांडल आणि अंधेरीच्या मसौवा परिसरातील फिशरीज युनिवर्सिटी रोडजवळ जोडे सध्या, वमौवा आणि मंड दरम्यान कोणताही पेट मार्ग नाही. ज्यामुळे प्रधान लोखंडवाला, ओशिवरा, लिक रोड किंवा मार्च रोड मार्गे लांब आणि वेळखाऊ प्रयास करावा लागतो.नदीच्या वेळेत, हा प्रवास एक ते दीड तासाचा असती. प्रस्तावित पूल बांधल्यानंतर, अंतर अंदाजे ५८ ते २० किलोमीटरने कमी होईल आणि प्रवासाचा वेळ फक्त १० मिनिटे राहील.

### प्रकल्प २०२९ पर्यंत पूर्ण

२.०६ किमी लांबीच्या या पुलावर ६०० मीटर केबल-स्टेड संवशन असेल, ज्यामध्ये ३०० मीटरचा मुख्य स्पेन असेल.दहिसर-भाईंदर कोस्टल रोडला जोडणारा एक अतिरिक्त मार्ग देखील प्रस्तावित आहे. बीएमसी अधिका-यांच्या मते, वन विभागाकडून अंतिम मंजुरी आणि उच्च न्यायालयाची परवानगी मिळाल्यानंतर पूर्ण प्रमाणात काम सुरू होईल, हा प्रकल्प ३१ मार्च २०२९ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

# THANE-CSMT प्रवास सोपा होणार!

## सायन उड्डाणपुलाला समांतर दोन पदरी पूल उभारणार

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महानगरपालिकेने शिव उड्डाणपुलाची पुनर्बांधणी करून त्याला समांतर दोन पदरी उड्डाणपुल बांधण्याचा निर्णय घेतला आहे (सायन). या प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यासाठी वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट (व्हीजेटीआय) ची निवड करण्यात आली आहे.**

नवीन उड्डाणपुल बांधला गेला तर ठाणे आणि छत्रपती शिवाजी टर्मिनस (सीएसएमटी) दरम्यानचा प्रवास सोपा आणि जलद होईल असा महापालिकेचा दावा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील सायन उड्डाणपुलाचा पूर्व-पश्चिम मार्ग आहे. महानगरपालिका त्याच्या नूतनीकरणाचे काम करत आहे. हा पूल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने बांधला आहे. सध्या, या पुलावर “टू प्लस वन” लेनची व्यवस्था आहे. ठाणे आणि पूर्व उपनगरात जाणाऱ्या वाहनांसाठी दोन लेन आणि दक्षिण मुंबईतील सीएसएमटीला जाणाऱ्या वाहनांसाठी एक लेन आहे. वाढत्या वाहनांमुळे गर्दीच्या वेळी वाहतूक कोंडी होते. त्यामुळे वाहतूक सुरळीत करण्यासाठी समांतर उड्डाणपूल प्रस्तावित आहे.नवीन उड्डाणपूल ठाणे ते सीएसएमटीला थेट मार्ग प्रदान करेल. दक्षिणेकडे





जाणाऱ्या वाहतुकीसाठी स्वतंत्र लेनमुळे सध्याचा वाहतुकीचा ताण कमी होईल. यामुळे प्रवास जलद, अधिक आरामदायी आणि इंधनाची बचत होईल अशी अपेक्षा आहे. वाहतूक पोलिसांनीही या पुलाची आवश्यकता असल्याचे पुष्टी केली आहे. या प्रकल्पाची अंदाजे किंमत ₹१५५ कोटी, २३७ हजार रुपये आहे.खरं तर, महालक्ष्मी परिसरातील उड्डाणपूल विस्ताराचे काही काम एका कंत्राटदाराला देण्यात आले होते. तथापि, वाहतूक आणि पोलिस आयुक्तांनी संबंधित ठिकाणी पुलाची आवश्यकता नसल्याचे सांगून या कामांसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास नकार दिला. शिवाय, अतिक्रमणे हटवण्यात आली नव्हती. परिणामी, काम सुरू होऊ शकले नाही. भविष्यात हा कंत्राटदार अतिरिक्त शुल्क मागू शकतो. त्यामुळे, हा संघर्ष टाळण्यासाठी, महानगरपालिका त्याच कंत्राटदाराला नवीन पूल देण्याचा विचार करत आहे.सायन उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीचे काम वेगाने सुरू आहे आणि मे २०२६ पर्यंत ते पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. सध्या, महानगरपालिका रेल्वे हद्दी, रेल्वे पुलाच्या उत्तरेकडील बाजूला गर्डर बसवणे, प्रवेश रस्ते, रेल्वे सूत्रांनी सांगितले की एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात गर्डर बसवणे पूर्ण होईल. त्यानंतर, रेल्वे हद्दीतील उर्वरित काम पूर्ण केले जाईल

### ही नवीन योजना

खरं तर, महालक्ष्मी परिसरातील उड्डाणपूल विस्ताराचे काही काम एका कंत्राटदाराला देण्यात आले होते. तथापि, वाहतूक आणि पोलिस आयुक्तांनी संबंधित ठिकाणी पुलाची आवश्यकता नसल्याचे सांगून या कामांसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास नकार दिला. शिवाय, अतिक्रमणे हटवण्यात आली नव्हती.

**देणग्यांमध्ये तिप्पट वाढ** — २,६६८ कोटींच्या निधीपैकी ८२ टक्के वाटा भाजपला

# भाजपला वर्षात 3,112 कोटींची देणगी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे योजना रद्द केल्याच्या एक वर्षानंतर, एक धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. कॉर्पोरेट ट्रस्टने राजकीय पक्षांना मोठ्या प्रमाणात देणग्या दिल्या आहेत. न्यायालयाने निवडणूक रोखे योजना रद्द केल्यानंतर, राजकीय पक्षांना पहिल्याच आर्थिक वर्षात भरपूर पैसे मिळाले आहेत. २०२४-२५ या आर्थिक वर्षात, नऊ निवडणूक ट्रस्टनी विविध राजकीय पक्षांना एकूण ३,८११ कोटी रुपयांचे देणगी दिली आहे. भाजपला याचा सर्वात मोठा फायदा झाला आहे.**

## एक धक्कादायक आकडेवारी समोर




सर्वोच्च न्यायालयाने इलेक्टोरल बाँड्स (निवडणूक रोखे) द्वारे दिली जाणारी निनावी राजकीय देणगी योजना रद्द केल्यानंतर पहिल्याच आर्थिक वर्षात नऊ 'इलेक्टोरल ट्रस्ट'नी २०२४-२५ मध्ये राजकीय पक्षांना एकूण ३,८११ कोटी रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत. केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला (भाजपा) यापैकी ३,११२ कोटी रुपये मिळाले आहेत. भारतीय निवडणूक आयोगाकडे विविध ट्रस्टनी सादर केलेल्या अहवालानुसार, काँग्रेसला या देणग्यांपैकी ८ टक्क्यांहून कमी म्हणजेच २९९ कोटी रुपये मिळाले आहेत. उर्वरित ४०० कोटी रुपये इतर सर्व पक्षांना मिळाले आहेत. राजकीय पक्षांना मिळालेल्या एकूण देणग्यांचा आकडा यापेक्षा जास्त असू शकतो, कारण- इलेक्टोरल ट्रस्ट हा निधी मिळवण्याचा एक प्रमुख मार्ग असला तरी तो एकमेव मार्ग नाही.शनिवार, २० डिसेंबरपर्यंत नोंदणीकृत १९ ट्रस्टपैकी १३ ट्रस्टचे अहवाल उपलब्ध झाले आहेत. त्यापैकी नऊ ट्रस्टनी पक्षांना ३,८११ कोटी रुपयांची मदत दिल्याचे जाहीर केले आहे. २०२३-२४ मधील १,२१८ कोटी रुपयांच्या तुलनेत यामध्ये २०० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. दरम्यान, जनहित, परिवर्तन, जयहिंद आणि जयभारत या चार ट्रस्टनी २०२४-२५ मध्ये 'शून्य' मदत दिल्याचे जाहीर केले आहे. प्रुडंट इलेक्टोरल ट्रस्ट : भाजपला सर्वाधिक देणगी देणाऱ्यांमध्ये ही ट्रस्ट आघाडीवर आहे. त्यांनी भाजपला २,१८०.०७ कोटी रुपये दिले आहेत. या ट्रस्टला जिंदाल स्टील अँड पॉवर, मेघा

## प्रमुख देणगीदार आणि ट्रस्ट

मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ही योजना असंवैधानिक ठरवून रद्द केली. आता कॉर्पोरेट कंपन्यांना चेक, डीडी किंवा यूपीआय बँक ट्रान्सफरद्वारे पक्षांना देणगी देता येते. पक्षांना या देणग्यांची माहिती निवडणूक आयोगाला वार्षिक ऑडिट रिपोर्टमध्ये देणे बंधनकारक आहे.अहवालात असे म्हटले आहे की सध्या देशात १९ निवडणूक ट्रस्ट नोंदणीकृत आहेत.

इंजिनिअरिंग, भारती एअरटेल, ऑरोबिंदो फार्मा आणि टॉरंट फार्मास्युटिकल्स यांसारख्या कंपन्यांकडून निधी मिळाला. या ट्रस्टने काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, आम आदमी पार्टी आणि टीडीपीलाही निधी दिला, मात्र त्यांच्या एकूण २,६६८ कोटींच्या निधीपैकी ८२ टक्के वाटा एकट्या भाजपला मिळाला. प्रोग्रेसिव्ह इलेक्टोरल ट्रस्ट: या ट्रस्टने विविध कंपन्यांकडून ९१७ कोटी रुपये जमा केले आणि त्यापैकी ९१४.९७ कोटींचे वाटप केले. यातील ८०.८२ टक्के रक्कम भाजपला मिळाली. टाटा सन्स, टीसीएस, टाटा स्टील, टाटा मोटर्स आणि टाटा पॉवर यांसारख्या टाटा समूहातील कंपन्यांनी यात मोठे योगदान दिले.हार्मनी इलेक्टोरल ट्रस्ट: या ट्रस्टला ३५.६५ कोटी रुपये मिळाले, ज्यापैकी ३०.१५ कोटी भाजपला देण्यात आले. यात भाजपाच्या पुणे युनिटला मिळालेल्या १५ लाख रुपयांचा समावेश आहे. या ट्रस्टला 'भारत फोर्ज'कडून २२ कोटी, 'सारलोहा अ‍ॅडव्हान्स्ड मटेरिअल्स'कडून ८ कोटी आणि 'कल्याणी स्टील'कडून ५ कोटी रुपये मिळाले. इतर देणग्या : मुंबईतील केईसी इंटरनॅशनल लिमिटेड ही 'जनप्रगती इलेक्टोरल ट्रस्ट'ला देणगी देणारी एकमेव कंपनी ठरली. त्यांनी दिलेल्या १.०२ कोटींपैकी १ कोटी रुपये शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाला मिळाले.२०२३-२४ मध्ये भाजपाला एकूण ३,९६७.१४ ज्यामध्ये ४३ टक्के (१,६८५.६२ कोटी) वाटा इलेक्टोरल बाँड्सचा होता.

# आणखी एका हिंदू व्यक्तीला मारहाण

## बांगलादेशमध्ये पुन्हा एका हिंदू व्यक्तीला मारहाण केल्याची घटना

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बांगलादेशमधील बंडखोर नेता शरीफ उस्मान हादीच्या मृत्यूनंतर उसळलेल्या हिंसाचारात एका हिंदू तरुणाची जमावाने हत्या केली. टेक्सटाईल कारखान्यात काम करणाऱ्या दीपू चंद्र दास नावाच्या कामगाराला मारहाण करून जमावाने झाडाला बांधून जाळले. दीपू चंद्र दासवर ईशनिंदेचा आरोप करण्यात आला होता.**

यानंतर आता पुन्हा एकदा बांगलादेशमध्ये हिंदू व्यक्तीला मारहाण झाल्याचा दावा करण्यात येत आहे. याचा व्हिडीओही सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. स्थानिक यंत्रणेच्या दाव्यानुसार सदर घटना बांगलादेशच्या खुलना विभागातील झेनाइदाह जिल्ह्यात घडल्याचे सांगितले जात आहे. मात्र या घटनेची माहिती अद्याप अधिकृत करण्यात आलेली नाही. पीडित व्यक्तीचे नाव गोबिंदा बिस्वास असून तो रिक्षाचालक आहे. त्याच्या मनगटावर लाल धागा बांधल्याचे पाहिल्यानंतर स्थानिकांनी त्याच्याशी हुज्जत घातली आणि मग मारहाण केली. बांगलादेशमधील शोधपत्रकारिता करणारे मुक्त पत्रकार शहीदुल हसन खोकोन यांनी हा व्हिडीओ एक्सवर शेअर



केला आहे. मात्र हा व्हिडीओ नेमका कुठला? किंवा त्यातील घडलेली घटना ताजी आहे का? याची खातरजमा प्रमुख माध्यमांनी किंवा बांगलादेश सरकारने अद्याप केलेली नाही.मुक्त पत्रकार शहीदुल हसन खोकोन यांनी एक्स पोस्टमध्ये लिहिले की, प्रत्यक्षदर्शींनी सांगितल्यानुसार, बिस्वास हा भारतातील गुप्तचर संस्था रिसर्च अँड एनालिसिस विंगशी (RAW) निगडित असल्याची अफवा पसरली. ही अफवा पसरल्यानंतर काही लोक

## व्हिडीओ मीडियावर व्हायरल

दोन दिवसांपूर्वी मैमनसिंग येथे भारतीय कामगार दीपू चंद्र दासची हत्या झाल्यानंतर बांगलादेशमधील वातावरण ढवळून निघाले आहे. या घटनेमुळे अल्पसंख्याकांकडून ठिकठिकाणी निदर्शने केली जात आहेत. यापूर्वीही हिंदू अल्पसंख्यांकावर हल्ले झाले होते. त्यावेळी भारताने या हल्ल्यांचा तीव्र शब्दात निषेध केला होता.मात्र हा व्हिडीओ नेमका कुठला? किंवा त्यातील घडलेली घटना ताजी आहे का?

त्याच्याजवळ जमले.झेनाइदाह महानगरपालिकेच्या गेटजवळ आणून बिस्वासला काही लोक मारहाण करत असल्याचे दिसत आहे. त्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचलेले दिसतात. यानंतर पोलीस जमावाच्या तावडीतून बिस्वासला बाजूला नेताना दिसत आहेत. यावेळी त्याच्या चेहऱ्यावर आणि छातीवर जखम झाल्याचे दिसत आहे.कथित व्हायरल होणाऱ्या व्हिडीओमध्ये बिस्वास पोलिसांकडे मदतीची याचना करत आहे. तो एक सामान्य रिक्षाचालक असल्याचे पोलिसांना सांगतो. तसेच त्याला सोडून देण्याची विनंती पोलिसांकडे करतो. त्यानंतर त्याला झेनाइदाह सदर पोलीस ठाण्यात नेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

# धुरंधर हा केवळ एक मनोरंजनात्मक चित्रपट

कटेंट क्रिएटर ध्रुव राठीने दिग्दर्शक आदित्य धरच्या धुरंधर या चित्रपटावर एक टिका करणारा व्हिडीओ शेअर केला आहे. हा चित्रपट धोकादायक प्रचाराचा आणि खोटेपणाचा मोठा नमुना असल्याचे म्हटले आहे. राजकीय विषयांवर नेहमीच भाष्य करणाऱ्या ध्रुव राठीने चित्रपटातील हिंसेबद्दल अनेकदा टीका केली आहे. भारतात नुकत्याच गाजत असलेल्या धुरंधर चित्रपटाबद्दल बोलत असताना राठीने म्हटले की, चित्रपटात राजकीय भाष्य आहे आणि इतर वाईट चित्रपटांपेक्षाही हा चित्रपट जास्त धोकादायक आहे.शनिवारी संध्याकाळी ध्रुव राठीने आपल्या युट्यूब चॅनेलवर रिॲलिटी ऑफ धुरंधर नावाचा एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडीओद्वारे त्याने धुरंधरला खोटा आणि वाह्यात प्रचार असल्याचा आरोप केला आहे. “दिग्दर्शक आदित्य धरने चित्रपटातून असत्य पसरवण्याचा प्रयत्न केला आहे. सदर चित्रपट चांगल्या पद्धतीने बनवला असल्यामुळेच तो अधिक धोकादायक झाला आहे. चांगल्या प्रकारे बनवलेला प्रचारपट हा कधीही जास्त धोकादायक असतो. द ताज स्टोरी आणि द बंगाल फाइल्ससारखे चित्रपट धोकादायक नव्हते, कारण मुळातच वाईट होते, पण धुरंधर त्या तुलनेत आकर्षक झाला आहे”, असे राठीने म्हटले आहे.धुरंधर हा केवळ एक मनोरंजनात्मक चित्रपट आहे, असे सांगून चित्रपटाचा बचाव करणाऱ्यांनाही ध्रुव राठीने टोला लगावला आहे. “धुरंधर चित्रपटात तुम्हाला वारंवार खऱ्या प्रसंगातून प्रेरित असल्याचे सांगितले जाते.

# रवी जाधव यांचं फार्महाऊस आहे खूपच सुंदर



मराठी सिनेविश्वाला ‘बालक पालक’, ‘नटरंग’, ‘टाइमपास’, ‘न्यूड’, ‘रंपाट’, ‘बालगंधर्व’ अशा बऱ्याच दर्जेदार कलाकृती देणारे लोकप्रिय दिग्दर्शक म्हणून रवी जाधव यांना ओळखलं जातं. मराठीसह हिंदी कलाविश्वात देखील त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. सोशल मीडियावर सुद्धा ते कायम सक्रिय असतात. त्यांनी नुकत्याच शेअर केलेल्या एका पोस्टने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. यामध्ये रवी जाधव यांच्या फार्महाऊसची झलक पाहायला मिळत आहे. “हे आहे आमचं फार्महाऊस” असं कॅप्शन देत रवी जाधव यांनी त्यांच्या सेकंड होमचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. आम्ही जेव्हा-जेव्हा याठिकाणी भेट देतो तेव्हा मनाला शांती मिळते आणि नवीन काहीतरी करण्याची प्रेरणा मिळते असंही दिग्दर्शकांनी म्हटलं आहे. रवी जाधव यांचं फार्महाऊस अलिबाग येथील नागाव परिसरात आहे.

# तिलोत्तमा आला धक्कादायक अनुभव

‘ ल स्ट स्टोरीज २’ व ‘त्रिभुवन मिश्रा: सीए टॉपर’ अशा वेब सीरिजसह अनेक चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारणारी बॉलीवूड अभिनेत्री म्हणजे तिलोत्तमा शोम (TILLOTAMA SHOME) होय. आपल्या अभिनयाबरोबरच ती स्पष्टवक्तेपणासाठीही ओळखली जाते. आता तिने तिच्याबरोबर घडलेला एक वाईट प्रसंग सांगितला आहे. तिलोत्तमाला राजधानी दिल्लीत हा भयंकर अनुभव आला होता.“मी दिल्लीत एके ठिकाणी बसची वाट पाहत थांबले होते. थंडीचे दिवस होते आणि अंधार पडला होता. त्याचवेळी एक कार माझ्या जवळ येऊन थांबली, त्या कारमध्ये सहा जण होते. त्यांना पाहून मला अस्वस्थ वाटलं आणि स्वतःचे संरक्षण करण्यासाठी मी तिथून थोडी दूर गेले. नंतर त्यांनी माझ्याकडे पाहून विचित्र हावभाव करायला सुरुवात केली, तसेच कोणीतरी माझ्यावर एक छोटा दगड फेकला. त्याचवेळी मला लक्षात आलं की मी आता इथून निघायला हवं. मी तिथून पळण्याचा विचार केला, पण ते कारमध्ये होते, त्यामुळे मला सहज पकडू शकले असते. मग मी रस्त्याच्या मधोमध उभं राहून मदत मागायचं ठरवलं“त्यानंतर खूप गाड्या त्या रस्त्यावरून गेल्या, मग मला मेडिकल साइन असलेली एक कार दिसली. मला वाटलं की डॉक्टरची गाडी असल्याने मी सुरक्षित राहीन. मी त्या गाडीत पुढच्या सीटवर बसले. पण काही वेळाने गाडीच्या ड्रायव्हरने त्याच्या पँटची चैन उघडली आणि माझा हात पकडला. त्याने जबरदस्ती माझा हात त्याच्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला.



# मराठी अभिनेत्रीचा नव्या घरात गृहप्रवेश

आपलं हक्काचं घर असावं असं प्रत्येकाचं स्वप्न असतं. २०२५ मध्ये अनेक मराठी कलाकारांचं हे स्वप्न पूर्ण झालं आहे. काही दिवसांपूर्वीच ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ फेम अभिनेत्री वनिता खरातने तिच्या सहकलाकारांसह नव्या घरात गृहप्रवेश केल्याचं पाहायला मिळालं. आता या पाठोपाठ छोट्या पडद्यावरील आणखी एका अभिनेत्रीने चाहत्यांसह नवीन घर घेतल्याची आनंदाची बातमी शेअर केली आहे. ही अभिनेत्री कोण आहे आणि तिने नवीन घर कुठे घेतलंय जाणून घेऊयात... मालिका विश्वातील कलाकार अल्पावधीतच घराघरांत लोकप्रिय होतात. ‘झी मराठी’ वाहिनीवर २०२२ मध्ये ‘अप्पी आमची कलेक्टर’ ही मालिका सुरू झाली होती. जवळपास तीन वर्षे रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवल्यावर या मालिकेने मार्च २०२५ मध्ये सर्वांचा निरोप घेतला. यामध्ये शिवानी नाईक ( अप्पी ) आणि रोहित परशुराम ( अर्जुन ) यांच्या प्रमुख भूमिका होत्या. मात्र, या सिरिलयलमधील अन्य कलाकार सुद्धा घराघरांत लोकप्रिय झाले होते.अप्पी आमची कलेक्टर’ मध्ये प्रियांका कदम ( पियू ) ही भूमिका अभिनेत्री नीलम वाडेकरने साकारली होती. यानंतर देखील ती बऱ्याच मालिकांमध्ये झळकली. आता अभिनेत्रीने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत नवीन घर घेतल्याची आनंदाची बातमी सर्वांना दिली आहे. अभिनेत्रीने स्वकष्टाने घेतलेल्या घरात आपल्या कुटुंबीयांसह गृहप्रवेश केला आहे.

# वल्लरी विराजच्या हाताला दुखापत

‘नवरी मिळे हिटलरला’ या मालिकेने मार्च २०२४ ते मे २०२५ या वर्षभरात प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं होतं. या मालिकेमुळे अभिनेत्री वल्लरी विराज घराघरांत लोकप्रिय झाली. तिने साकारलेल्या लीलाच्या भूमिकेने सर्वांची मनं जिंकून घेतली होती. वल्लरीसह या मालिकेत अभिनेता राकेश बापट प्रमुख भूमिकेत झळकला होता. आता वल्लरी पुन्हा एकदा एका नव्या मालिकेच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ‘झी मराठी’वर कमबॅक करण्यासाठी ती सज्ज झालेली आहे. मात्र, अशातच तिने नुकत्याच शेअर केलेल्या एका व्हिडीओने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे आणि तिचे चाहते चिंतेत पडले आहेत. वल्लरीने आपल्या अभिनयाने सर्वांची मनं जिंकून घेतली आहेत. पण, याचबरोबर ती उत्तम नृत्यांगना सुद्धा आहे. वल्लरी आणि आलापिनी यांच्या नृत्य सादरीकरणाचे व्हिडीओ सोशल मीडियावर नेहमीच व्हायरल होत असतात. या दोघी विविध गाण्यांवर अप्रतिम नृत्य सादर करतात. विशेषत: त्यांच्या एक्स्प्रेशन्सचं भरभरून कौतुक करण्यात येतं.वल्लरीने नुकत्याच शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये इमरान हाश्मीच्या PEE LOON गाण्यावर सुंदर नृत्य सादर केलं आहे. पण, या व्हिडीओमध्ये अभिनेत्रीने हाताला फ्रॅक्चर बँडेज बांधल्याचं पाहायला मिळतंय. यामुळे अभिनेत्रीचे चाहते चिंतेत पडले आहेत.काय झालं हाताला”, “वल्लरी मॅम काय झालं काळजी घ्या”, “हाताला काय झालं तुमच्या काळजी घ्या मॅम”, “एक्स्प्रेशन्स नेहमीप्रमाणे कमाल आहेत पण तुमच्या हाताला काय झालं?”, “वल्लरी काळजी घे गं” अशा असंख्य कमेंट्स वल्लरीच्या चाहत्यांनी या व्हिडीओवर केल्या आहेत. आता वल्लरीच्या हाताला नेमकी कशामुळे दुखापत झालीये याबाबत तिने कोणतीही माहिती शेअर केलेली नाही. पण, या व्हिडीओला तिने “IN SICKNESS AND IN HEALTH” असं कॅप्शन दिलं आहे. दरम्यान, वल्लरी लवकरच झी मराठीच्या ‘शुभ श्रावणी’ मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे ही मालिका जानेवारी महिन्यात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ‘नवरी मिळे हिटलरला’ या मालिकेने मार्च २०२४ ते मे २०२५ या वर्षभरात प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं होतं. या मालिकेमुळे अभिनेत्री वल्लरी विराज घराघरांत लोकप्रिय झाली. तिने साकारलेल्या लीलाच्या भूमिकेने सर्वांची मनं जिंकून घेतली होती. वल्लरीसह या मालिकेत अभिनेता राकेश बापट प्रमुख भूमिकेत झळकला होता. आता वल्लरी पुन्हा एकदा एका नव्या मालिकेच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



स्मृतीने इतिहास घडवला

टी-२०मध्ये अशी कामगिरी करणारी पहिली महिला

# स्मृती मानधनाने इतिहास घडवला

## स्मृतीने ४ हजार धावा पूर्ण केल्या




। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि श्रीलंका महिला संघांमध्ये टी-२० मालिका खेळवली जात आहे. वनडे विश्वचषकानंतर आता महिला संघ २०२६ मध्ये होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषकासाठी तयारी करत आहे आणि त्यासाठी संघाची पहिली परिक्षा श्रीलंकेविरूद्ध आहे. श्रीलंकेने दिलेल्या १२२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना स्मृती मानधनाने १८ धावा करताच मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. बऱ्याच दिवसांच्या विश्रांतीनंतर मैदानावर उतरताच स्मृतीने ऐतिहासिक कामगिरी केली आहे.**

पहिल्या टी-२० सामन्याची नाणेफेक टीम इंडियाने जिंकत श्रीलंकेला फलंदाजीसाठी पाचारण केलं. यासह संघाने उत्कृष्ट गोलंदाजी करत श्रीलंकेला धावा करण्यासाठी फार मेहनत घ्यावी लागली. यासह श्रीलंकेचा संघ २० षटकांत ६ बाद १२१ धावा करू शकला. भारताने श्रीलंकेच्या ३ फलंदाजांना तर धावबाद ककरत बाद केलं.श्रीलंकेने दिलेल्या १२२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दुसऱ्याच षटकात शफाली वर्मा लवकर बाद झाली. यानंतर स्मृती मानधना संघाच्या डावाची जबाबदारी घेत सांभाळून खेळताना दिसली. त्यानंतर तिने संधी मिळताच दणदणीत चौकार खेचत १८ धावा केल्या. यासह तिने टी-२० क्रिकेटमध्ये ४ हजार धावांचा मोठा आकडा गाठला. स्मृतीने १२४ च्या स्ट्राईक रेटने १५५व्या सामन्यात ४ हजार धावा पूर्ण केल्या. स्मृती मानधना टी-२० क्रिकेटमध्ये ४ हजार धावा करणारी भारताची पहिली फलंदाज ठरली. तर टी-२० मध्ये ४ हजार धावांचा पल्ला गाठणारी स्मृती मानधना जगातील दुसरी फलंदाज ठरली आहे. तिच्याआधी न्यूझीलंडच्या सुझी बेट्सने ही कामगिरी केली होती. न्यूझीलंडच्या सुझी बेट्सने ३६७५ चेंडूत ४ हजार धावांचा टप्पा गाठला, तर स्मृती मानधनाने फक्त ३२२७ चेंडूत ४ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. भारत आणि श्रीलंका महिला संघांमध्ये टी-२० मालिका खेळवली जात आहे. वनडे विश्वचषकानंतर आता महिला संघ २०२६ मध्ये होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषकासाठी तयारी करत आहे आणि त्यासाठी संघाची पहिली परिक्षा श्रीलंकेविरूद्ध आहे. श्रीलंकेने दिलेल्या १२२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना स्मृती मानधनाने १८ धावा करताच मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. बऱ्याच दिवसांच्या विश्रांतीनंतर मैदानावर उतरताच स्मृतीने ऐतिहासिक कामगिरी केली आहे.३६७५ चेंडूत ४ हजार धावांचा टप्पा गाठला, तर स्मृती मानधनाने फक्त ३२२७ चेंडूत ४ हजार धावा पूर्ण केल्या आहेत.पहिल्या टी-२० सामन्याची नाणेफेक टीम इंडियाने जिंकत श्रीलंकेला फलंदाजीसाठी पाचारण केलं. यासह संघाने उत्कृष्ट गोलंदाजी करत श्रीलंकेला धावा करण्यासाठी फार मेहनत घ्यावी लागली. यासह श्रीलंकेचा संघ २० षटकांत ६ बाद १२१ धावा करू शकला. भारताने श्रीलंकेच्या ३ फलंदाजांना तर धावबाद ककरत बाद केलं.श्रीलंकेने दिलेल्या १२२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दुसऱ्याच षटकात शफाली वर्मा लवकर बाद झाली. यानंतर स्मृती मानधना संघाच्या डावाची जबाबदारी घेत सांभाळून खेळताना दिसली. त्यानंतर तिने संधी मिळताच दणदणीत चौकार खेचत १८ धावा केल्या.धावांचा मोठा आकडा गाठला. स्मृतीने १२४ च्या स्ट्राईक रेटने १५५व्या सामन्यात ४ हजार धावा पूर्ण केल्या.स्मृती मानधना टी-२० क्रिकेटमध्ये ४ हजार धावा करणारी भारताची पहिली फलंदाज ठरली. तर टी-२० मध्ये ४ हजार धावांचा पल्ला गाठणारी स्मृती मानधना जगातील दुसरी फलंदाज ठरली आहे. तिच्याआधी न्यूझीलंडच्या सुझी बेट्सने ही कामगिरी केली होती. न्यूझीलंडच्या सुझी बेट्सने ३६७५ चेंडूत ४ हजार धावांचा टप्पा गाठला, तर स्मृती मानधनाने फक्त ३२२७ चेंडूत ४ हजार धावा पूर्ण केल्या आहेत.

### ३२२७ चेंडूत ४ हजार धावा

पहिल्या टी-२० सामन्याची नाणेफेक टीम इंडियाने जिंकत श्रीलंकेला फलंदाजीसाठी पाचारण केलं. यासह संघाने उत्कृष्ट गोलंदाजी करत श्रीलंकेला धावा करण्यासाठी फार मेहनत घ्यावी लागलीभारताने श्रीलंकेच्या ३ फलंदाजांना तर धावबाद ककरत बाद केलं.श्रीलंकेने दिलेल्या १२२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दुसऱ्याच षटकात शफाली वर्मा लवकर बाद झाली. यानंतर स्मृती मानधना संघाच्या डावाची जबाबदारी घेत सांभाळून खेळताना दिसली.

# अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूर झाला बाबा

## शार्दुलने इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत दिली आनंदाची बातमी



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाचा अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूर बाबा झाला आहे. शार्दुल ठाकूरने पत्नी मिताली पारूलकरबरोबर फोटो शेअर करत ही आनंदाची बातमी चाहत्यांबरोबर शेअर केली आहे. शार्दुलने अचानक बाबा झाल्याची माहिती देत चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे. शार्दुल व मिताली यांनी 2023 मध्ये लग्नगाठ बांधली होती.**

शार्दुल ठाकूरने शेअर केलेल्या पोस्टमध्ये पहिल्या फोटोमध्ये मुलगा झाल्याची आनंदाची बातमी दिली. यानंतर त्याने पत्नी मिताली पारूलकरसह काही गोड फोटो शेअर केले आहेत. शार्दुल ठाकूर सध्याच्या घडीला देशांतर्गत क्रिकेट खेळत असून तो आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळणार आहे.

मराठमोळा शार्दुल ठाकूर व मिताली पारूलकर यांनी २७ फेब्रुवारी २०२३ मधेये लग्न केलं होतं आणि हे जोडपं आता पहिल्यांदाच आई-बाबा झालं आहे. मुलाच्या जन्मानंतर, शार्दुल ठाकूरने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली, ज्यामध्ये लिहिलं, "स्वागत आहे बाळा, आम्ही गेल्या नऊ महिन्यांपासून तुझी वाट पाहत होतो.

या जगात तुझे स्वागत आहे." अनेक क्रिकेटपटू व त्यांच्या पार्टनरने शार्दुल व मितालीला कमेंट्स करत शुभेच्छा दिल्या आहेत.शार्दुल ठाकूर आगामी आयपीएल 2026 मध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळताना दिसेल. मुंबईने त्याला लिलावापूर्वी व मिताली यांनी ज्युनियर लॉर्डच्या आगमनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.शार्दुल ठाकूर बराच काळ टीम इंडियाबाहेर आहे, पण अलिकडेच तो रणजी ट्रॉफीमध्ये आणि नंतर सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये मुंबईचे नेतृत्व करताना दिसला.

### शार्दुल मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात

अंतिम फेरीत पोहोचण्यात अपयशी ठरला. शार्दुल ठाकूर हा एक उत्कृष्ट वेगवान गोलंदाज असून तो त्याच्या फलंदाजीसाठीही ओळखला जातो. भारतीय संघाचा अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूर बाबा झाला आहे. शार्दुल ठाकूरने पत्नी मिताली पारूलकरबरोबर फोटो शेअर करत ही आनंदाची बातमी चाहत्यांबरोबर शेअर केली आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। सोमवार।
दि. 22 डिसेंबर 2025
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# ‘टँकरमुक्त डुडूळगाव परिसर आणि सर्वांगीण विकास’ हेच माझे ध्येय : अनुराधा साळुंके

## जनसंपर्क मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; मूलभूत सुविधा, महिला सक्षमीकरणावर भर

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**डुडूळगाव परिसराचा सर्वांगीण विकास करून नागरिकांना हक्काच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचा ठाम निर्धार सामाजिक कार्यकर्त्या अनुराधा दीपक साळुंके यांनी व्यक्त केला. “डुडूळगाव टँकरमुक्त करणे, दर्जेदार पाणीपुरवठा, चांगले रस्ते, प्रकाश व्यवस्था तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी आधुनिक वाचनालय उभारणे ही माझी प्रमुख प्राधान्ये आहेत,” असे त्या म्हणाल्या.**



डुडूळगाव परिसरातील नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी साळुंके यांनी नुकतीच व्यापक जनसंपर्क मोहीम राबवली. श्री अडबंगनाथ महाराज मंदिर (डुडूळगाव), मोशी येथील श्री नागेश्वर महाराज मंदिर तसेच डुडूळगावमधील श्री संत शिरोमणी सावता माळी महाराज मंदिर येथे दर्शन घेऊन त्यांनी आपल्या मोहिमेचा प्रारंभ केला. यानंतर त्यांनी घरोघरी भेटी देत नागरिकांशी थेट संवाद साधला.

### मूलभूत सुविधांचा प्रश्न मार्गी लावणार

या दौऱ्यादरम्यान नागरिकांनी रस्त्यांची दुरवस्था, अपुरा पाणीपुरवठा आणि वीज समस्यांबाबत आपल्या तक्रारी मांडल्या. यावर प्रतिक्रिया देताना साळुंके म्हणाल्या, “डुडूळगावमध्ये सुसज्ज रस्ते आणि प्रभावी प्रकाश व्यवस्था उभारणे अत्यावश्यक आहे. पाण्याच्या समस्येमुळे नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागते; ही परिस्थिती बदलून डुडूळगाव कायमस्वरूपी टँकरमुक्त करणे हेच माझे स्वप्न आहे.” त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिकांच्या सामाजिक आणि बौद्धिक गरजांचा विचार करून सर्व सोयींनी युक्त असे आधुनिक वाचनालय उभारण्यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

> “डुडूळगावमधील प्रत्येक कुटुंबाला स्वच्छ पाणी, सुरक्षित रस्ते आणि मूलभूत सुविधा मिळाव्यात, यासाठी मी कटिबद्ध आहे. नागरिकांच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही. सर्वांच्या सहकार्याने डुडूळगावला विकसित, स्वयंपूर्ण आणि आदर्श परिसर बनवू.”
> –**अनुराधा साळुंके,** उमेदवार.

### महिला सक्षमीकरणासाठी ठोस उपक्रम

नागरी सुविधांसोबतच महिला सक्षमीकरणालाही साळुंके यांनी महत्त्व दिले आहे. “महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण, स्वयंरोजगाराच्या संधी आणि कौशल्य विकास उपक्रम राबवले जातील. महिलांनी आत्मनिर्भर व्हावे, यासाठी मी सातत्याने कार्यरत राहीन,” असे आश्वासन त्यांनी दिले.

### लोकसंपर्कातून वाढतोय विश्वास..

नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून त्यावर ठोस उपाययोजनांची दिशा मांडल्यामुळे डुडूळगाव परिसरात अनुराधा साळुंके यांच्याबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये त्यांना मोठा पाठिंबा मिळत असून, त्यांच्या कार्याबद्दल विश्वास वाढताना दिसत आहे. नागरिकांच्या सहकार्याने डुडूळगावला आदर्श आणि विकसित परिसर बनवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. या जनसंपर्क मोहिमेमुळे परिसरातील सामाजिक व राजकीय चर्चांना वेग आला असून, अनुराधा साळुंके यांच्या कार्याची आणि भूमिकेची चर्चा नागरिकांमध्ये जोमाने सुरू आहे.

# शालेय जिल्हास्तरीय युनिफाईट स्पर्धा उत्साहात

## शिक्षण विश्व : 143 विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; विजेत्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**क्रीडा सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व क्रीडा परिषद पुणे–पिंपरी चिंचवड महानगरपालिका तसेच युनिफाईट स्पोर्ट्स असोसिएशन, पिंपरी चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने २० डिसेंबर २०२५ रोजी शालेय जिल्हास्तरीय युनिफाईट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कावेरी नगर क्रीडा संकुल येथे झालेल्या या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**



स्पर्धेचे उद्घाटन पिंपरी चिंचवड क्रीडा पर्यवेक्षक श्री. दीपक कान्हेरे यांच्या हस्ते झाले. यावेळी यशवंत माने (अध्यक्ष, पिंपरी चिंचवड युनिफाईट संघटना), श्री. सुरेश कोळी, सर विष्णुपंत पाटील, सर किरण अडागळे, प्रफुल सर व संदीप माने आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत पिंपरी चिंचवडमधील विविध शाळांमधून विद्यार्थ्यांनी लक्षणीय सहभाग नोंदवला. न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव; एम.एम. विद्यामंदिर, काळेवाडी; पार्वती इंग्लिश मीडियम स्कूल, काळेवाडी; मातृ विद्यालय, वाल्हेकरवाडी; एसएनबीपी स्कूल; सेंट पीटर्स स्कूल; सिम्बायोसिस कॉलेज, किवळे; विद्या विकास प्रशाला; जुडसन हायस्कूल; बालाजी स्कूल; ज्ञानप्रभात विद्यालय आदी शाळांमधील एकूण १४३ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला. स्पर्धेमधील विजेत्या खेळाडूंची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. उपस्थित मान्यवरांनी सर्व विजेत्या खेळाडूंना पुढील वाटचालीस शुभेच्छा देत त्यांच्या यशाचे कौतुक केले.

## ‘नो प्लास्टिक’ उपक्रमांमधून

# विद्यार्थ्यांची पर्यावरण संरक्षणासाठी जागृती!

### शिक्षण विश्व : मोशीतील प्रियदर्शनी स्कूलचा कौतुकास्पद उपक्रम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी चिंचवड: मोशी येथील प्रियदर्शनी स्कूलमध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (पीसीएमसी) आरोग्य विभागाच्या सहकार्याने “नो प्लास्टिक वापर” हा जनजागृतीपर उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये प्लास्टिकच्या दुष्परिणामांबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.**

यावेळी पीसीएमसी आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्लास्टिकमुळे होणाऱ्या पर्यावरणीय व आरोग्यविषयक समस्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना कापडी पिशव्या, स्टीलच्या बाटल्या तसेच इतर पर्यावरणपूरक साहित्य वापरण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. तसेच कचरा वर्गीकरणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

उपक्रमाच्या अनुषंगाने शाळेच्या परिसरात जनजागृती फलक लावण्यात आले व पर्यावरण रक्षणाविषयी घोषणा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी प्लास्टिकचा वापर टाळण्याची शपथ घेतली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना हा संदेश समाजात पोहोचवण्यासाठी प्रेरित केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत सकारात्मक जाणीव निर्माण झाली. पीसीएमसी आरोग्य विभागाच्या सहकार्यामुळे हा उपक्रम अधिक प्रभावी ठरल्याचे शाळा प्रशासनाने नमूद केले. शाळेने भविष्यातही असे पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्याची बांधिलकी व्यक्त केली.

---

## काळजेवाडी, ताजणे मळ्यात पाळीव प्राणी लंपास; शेतीकामे ठप्प

### चऱ्होलीत बिबट्याची दहशत: वनविभागाकडे पिंजरा लावण्याची मागणी; मजुरांनी फिरवली पाठ, नागरिक भयग्रस्त

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**चऱ्होली बुद्रुक परिसरातील काळजेवाडी, चोविसावाडी आणि ताजणे मळा परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याने ठिय्या मांडला आहे. बिबट्याचा वावर थेट मानवी वस्तीत वाढल्याने नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण असून, अनेक पाळीव जनावरे गायब झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. सायंकाळनंतर घराबाहेर पडणे कठीण झाले असून, वनविभागाने याकडे तातडीने लक्ष देऊन बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी जोर धरत आहे.**

> **“बिबट्या थेट वस्तीजवळ येत असल्याने लहान मुले आणि ज्येष्ठांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे. मजूर कामावर येत नसल्याने शेतीची कामे खोळंबली आहेत. सायंकाळनंतर परिसरात फिरणे धोक्याचे झाले आहे.”**
>
> **—– सचिन कोतवाल, स्थानिक रहिवासी**

> “बिबट्याचा वावर सातत्याने वाढत आहे. रात्रीच्या वेळी तर सोडाच, पण दिवसाही शेतात पाऊल टाकताना भीती वाटते. मजुरांनी कामावर येण्यास नकार दिल्याने आमची उभी पिके धोक्यात आली आहेत. वनवि
>
> **–अनुराधा साळुंके, स्थानिक रहिवासी**

#### उसाच्या शेताचा बिबट्याला ‘सुरक्षित’ आधार

काळजेवाडी व चोविसावाडी परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर सातत्याने दिसून येत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. डी.पी. रस्त्यावरील ऋषिकेश काळजे यांच्या शेतात तर एअरपोर्ट रस्त्यावरील तनिष ऑर्किड, राही कस्तुरी आणि ग्लोबल सोसायटीजवळील भागात रात्रीच्या वेळी बिबट्याचे दर्शन झाल्याची माहिती वनविभागाला देण्यात आली आहे. काही प्रत्यक्षदर्शींनी तर बिबट्याला झाडावर, भिंतीवर तसेच शेतातील पाण्याच्या पट्ट्याजवळ बसलेले पाहिले. त्यामुळे परिसरात दहशत अधिक वाढली आहे.

या भागात उसाची शेती मोठ्या प्रमाणात आहे. उसाचे दाट शेत, पाण्याचे नाले आणि आसपासच्या ओढ्यांमुळे बिबट्याला लपण्यासाठी सुरक्षित जागा उपलब्ध होते. वनविभागाच्या अहवालांनुसार बिबट्यांच्या हालचालींसाठी उसाची शेती ‘सुरक्षित कॉरिडॉर’ ठरते. त्यामुळेच हा भाग वन्यप्राण्यांसाठी आकर्षण बनत आहे. बिबट्यामुळे परिसरातील शेती अर्थचक्र थांबण्याच्या स्थितीत आले आहे. परप्रांतीय व स्थानिक मजूर रात्रीच्या वेळी शेतात काम करण्यास नकार देत आहेत. रात्री पिकांना पाणी देणे जीवघेणे ठरत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी सिंचनच बंद केले आहे. परिणामी उसासह इतर पिके सुकू लागली आहेत आणि उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करत आहेत. एका स्थानिक शेतकऱ्याने सांगितले की, “पिकांचे नुकसान आणि कामगारांची टंचाई यामुळे आर्थिक संकटाचे ढग दाटले आहेत. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी.”

या प्रश्नावर तातडीने निर्णय घेतला नाही, तर शेतकऱ्यांच्या उपजीविकेवरच परिणाम होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.


www.rklgis.org
RKL GALAXY International School
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs: Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046